माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २३/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री.सेवाराम बस्तीराम भुतडा,**
**रा.जामोद, ता.जळगांव जामोद, जि.बुलढाणा**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय,**
**जळगांव जामोद, ता.जळगांव जामोद, जि.बुलढाणा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**उपविभगीय अधिकारी कार्यालय, जळगांव जामोद, ता.जळगाव जामोद, जि.बुलढाणा**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १८.०५.२०२३**

**तक्रारकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २८.११.२०२२ | २३.०१.२०२३ | १९.०१.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३१५८/२०१८ दि.२८.११.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १८.०५.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने व विद्यमान जन माहिती अधिकारी स्वत: श्री.संजय वासुदेव मारकंड हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसारआयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.३१५८/२०१८) मध्ये दिनांक २८.११.२०२२ रोजी सुनावणी घेवून "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली विनंती मान्य करुन त्यांना १५ दिवसात प्रथम अपील निकाली काढण्याची संधी देण्यात येत आहे. तसेच श्री.सी.एन.पाटील, अ.का. यांनी माहिती अधिकार विषयातील कर्तव्यामधील कसुराबाबत व शासकीय कामात दिरंगाई करणे ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार नुकसान भरपाईस पात्र ठरतात. त्यामुळे त्यांना रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात येत आहे. वरील नुकसान भरपाईची रक्कम वरील आदेश प्राप्त होताच ४ आठवड्याच्या आत अपिलार्थीस प्रदान करण्यात यावी. सदर नुकसान



राज्य माहिती आयोग कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

भरपाईची रक्कम संबंधीत जबाबदार कर्मचारी यांचेकडून वसुल करावे. त्याचप्रमाणे वरील जबाबदार कर्मचारी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम १९७९ नुसार कार्यवाही करण्यात यावी व अनुपालन अहवाल प्रथम अपील आदेशासोबत आयोगास सादर करावा. याशिवाय प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द बदल्याचे विनियमन व विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ नुसार इतर कार्यवाही करण्यात यावी" असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.सेवाराम बस्तीराम भुतडा यांनी द्वितीय अपील क्र.३१५८/२०१८ मध्ये आदेश पारित दिनांक २८.११.२०२२ रोजी आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार अनुपालन झाले नसल्याचे आक्षेप नोंदवित दि.१९.०१.२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर करुन त्यात नमुद केले की, द्वितीय अपील प्रकरण क्रमांक ३१५८/२०१८ मधील पारित आदेशाचे अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अपील अर्जावर सुनावणी घेवून प्रथम अपील निकाली काढले आहेत. तसेच श्री.सी.एन.पाटील यांचेवर दप्तर दिरंगाई अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बुलढाणा यांना सादर करण्यात आलेला आहे. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता श्री.सेवाराम भुतडा यांना दिनांक २३.०१.२०२३ रोजी कार्यालयात बोलावण्यात येवून नुकसान भरपाईची रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) रोखीने दिलेले असून पोच पावतीची स्थळप्रत आयोगास सादर केलेली आहे. यावरुन आयोगाचे द्वितीय अपील क्र.३१५८/२०१८ मध्ये दि.२८.११.२०२२ रोजी पारित आदेशाचे अनुषंगाने अनुपालन झालेले असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता, प्रस्तुतची तक्रार नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार क्र.२३/२०२३ नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक :१८.०५.२०२३**

जावक क्रमांक 2828 दिनांक 20/05/2023